# 7.1.9 : Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens









## धरणगाव महाविद्यालयात विविध क्षेत्रातील आठ कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

देशदूत

धरणगाव। प्रतिनिधी – प्रा.बी.एन.चौधरी

कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगावजिल्हा जळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना व युवती सभा विभागातर्फे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात आठ कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के एम पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अभिषेक जोशी उपस्थित होते.

कृषी क्षेत्रातून सौ रत्नमाला दिलीप पाटील या शेतकरी महीला साक्री ता. धरणगाव. वैद्यकीय क्षेत्रातून शासकीय रुग्णालय धरणगाव येथील आशाताई पदावर असणाऱ्या 'सरोज. झावरू भदाने. शैक्षणिक क्षेत्रातून धरणगाव संभाजीनगर येथील अंगणवाडी सेविका सौ जयश्री दिपेंद्र पाटील. समाजसेवक म्हणून सौ. सुरेखा सुनील चौधरी, गृहिणी म्हणून सौ. वंदना छबीलाल पाटील. संरक्षण क्षेत्रातून धरणगाव पोलीस स्टेशन हवालदार सौ. हर्षली हेमराज खैरनार, स्थानिक स्वराज्य संस्थांमधून नगरपालिका येथील बचत गट संघटक सौ. पुष्पा विजय सेकंदाने तर व्यवसायीक क्षेत्रातून ब्यूटीशियन देवयानी गुप्ता यांना आमंत्रित करून त्यांचा भारतीय नारी हे स्वामी विवेकानंद यांचे पुस्तक देवून सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. पाटील यांनी सरस्वती व सावीत्री यांच्या एकत्रित पुजनाने पंरपरा व संघषत्मिक यश या दोन्ही बाबी जपल्या गेल्या असे सांगितले. मुलींनी आजच्या समाजाला खंबीरपणे समोरे जाण्याची गरज आहे असे मत प्रो. डॉ. के. एम पाटील सर यांनी व्यक्त केले.

सूत्रसंचालन प्रा डॉ. ज्योती महाजन यांनी केले व प्रास्ताविक व आभार डॉ. कांचन महाजन यांनी व्यक्त केले

कार्यक्रमाला प्रा. बिरारी मॅडम, प्रा. कविता महाजन , प्रा. डॉ. तायडे मॅडम प्रा. प्राची पगारिया, प्रा. पूर्वा मॅडम, प्रा. श्रद्धा चौटे , प्रा पल्लवी मॅडम व सर्व महाविद्यालयीन विद्यार्थिनी उपस्थित होत्या.




**8TH MARCH, 2023, THE COLLEGE CELEBRATED INTERNATIONAL WOMEN'S DAY**

**Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens**










Principal
Arts, Commerce & Science College
Dharangaon, Dist. Jalgaon

P. R. H. S. Arts, Commerce & Science College
Dharangaon Dist. Jalgaon